# ड्रीम रनमध्ये मेट्रो-३ ची टीम!

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमधील २६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या टीमने रविवारी स्टॅंडर्ट चार्टर्ड मुंबई मॅरेथॉनच्या ड्रीम रनमध्ये सहभाग नोंदवत सीएसटी ते मेट्रो बिग सिनेमा ६ किमी अंतर यशस्वीपणे पार केले. या टीमचे नेतृत्व कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका आश्विनी भिडे यांनी केले.

सीएसटीहून स्पर्धेला सुरवात झाली. पुढे फ्लोरा फाउंटन, वीर नरिमन पॉईंट, ट्रायडंट हॉटेल, ओबेरॉय टर्न, सुंदर महाल, मारिन ड्राईव्ह आणि मेट्रो बिग सिनेमा असे हे अंतर पार केले. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी 'कनेक्टिंग द अनकनेक्टेट'चे स्लोगन असलेली खास टी शर्ट देखील तयार करण्यात आली होती.

अश्विनी भिडे म्हणाल्या की, ड्रीम रन टीमने यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा आनंद आहे. मॅरेथॉनवेळी जागोजागी बॅनर्स आणि माहिती पत्रकांद्वारे लोकांना आम्ही संपूर्ण भुयारी असलेल्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गाची माहिती देण्याचा प्रयत्न केला.